दिनांक ०७/०१/२०२१

## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक प्रवीण माधव सावकारे, पद- कृषी सहायक, नेमणुक- बहुलखेडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांनी शेतकऱ्याकडे ५०,०००/- रु लाचेची मागणी करून, तडजोडीअंती २०,०००/- रु लाच स्विकारल्याने ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | प्रवीण माधव सावकारे, वय ३६ वर्ष, पद- कृषी सहायक, नेमणुक- बहुलखेडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे सोयगाव, ता. सोयगाव, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. विकास घनवट, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | २०,०००/- रुपये. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत असलेले तक्रारदार यांचे दोन प्रकरणामध्ये पाहणी करून, सदर प्रकरणाचा वरिष्ठांना अहवाल सादर केल्याचे बक्षीस म्हणून तसेच त्यांचे कुटुंबातील दोन सदस्यांचे सदर योजनेअंतर्गत अहवाल वरिष्ठांना सादर करण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | तहसील कार्यालय समोर, सोयगाव, ता. सोयगाव, जिल्हा औरंगाबाद |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत असलेले तक्रारदार यांचे दोन प्रकरणामध्ये पाहणी करून, सदर प्रकरणाचा वरिष्ठांना अहवाल सादर केल्याचे बक्षीस म्हणून तसेच त्यांचे कुटुंबातील दोन सदस्यांचे सदर योजनेअंतर्गत अहवाल वरिष्ठांना सादर करण्यासाठी प्रवीण सावकारे, कृषी सहायक, हे ५०,०००/- रु लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, प्रवीण सावकारे, कृषी सहायक यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रथम ५०,०००/- रुपयाच्या लाचेची मागणी करून, तडजोडी अंती २०,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, प्रवीण माधव सावकारे, पद- कृषी सहायक, नेमणुक- बहुलखेडा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांनी वरील ठिकाणी तक्रारदार यांच्याकडुन २०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी लोकसेवक यांचे विरुद्ध पोलीस ठाणे सोयगाव, ता. सोयगाव, औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. विकास घनवट यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार गणेश पंडुरे, प्रकाश घुगरे, संतोष जोशी, मिलींद इपर, चालक अंमलदार बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

पोलीस उप अधीक्षक कार्यालय ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

07/01/2021

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद.**

